# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,कोकण विभाग,पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर,पनवेल,जि-रायगड - ४१०२०६

ईमेल पत्ता: jtdire.1115@gmail.com दूरध्वनी क्रमांक : (०२२) - २७४६ १४२०

क्र :-विससंउशिकोप-२०२६/प्रवेश शुल्काबाबत/आस्था दिनांक- २०.०५.२०२६

**प्रति,**

प्राचार्य ,
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित / विना अनुदानित /
कायम विनाअनुदानित महाविद्यालय, कोकण विभाग, पनवेल

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत..**

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई./६८४, दि. १३.०५.२०२६

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ (इ. १२ वी) चा निकाल जाहिर झाला असून, विभागीय सहसंलचाक उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल कार्यालयाच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे / होत आहे. त्यानुंषगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ / शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, ट्युशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (Other Fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करून देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवणार नाही, उद्भवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी.

Digitally signed by
Kirankumar Laxmanrao Bondar
Date: 20-05-2026 17:44:55

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत : मा. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in    E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई. /684    दि. मे.२०२६ 13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे

विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ ( इ.१२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

तरी सर्व संबंधित विभागीय सहसंचालक आणि कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रतः-१. मा.स्वीय सहाय्यक मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई



File No. JDHE_PANVELCOLLEGEFEES (Computer No. 3222933)
Generated from eOffice by SIDDHANT KHANDARE, JuniorClrk9, JUNIOR CLERK, JOINT DIRECTOR (HIGHER EDUCATION) PANVEL on 21/05/2026 09:59 AM